# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली

## जाहिरात

जाहिरात क्रमांक:- २७/२०१८ दिनांक :- २२/०५/२०१८

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली करीता महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्रमांक पदभ-२०१७/ प्र. क्र. ३५६/१७/विशि-१, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१८ व्दारे विद्यापीठासाठी मंजुर शिक्षकेत्तर पदांपैकी सरळसेवा कोट्यातील रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता प्रदान तसेच मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), म. रा. पुणे यांनी खालील प्रमाणे शिक्षकेत्तर पदे भरण्यास ना-हकरत प्रमाणपत्र क्रमांक एनजीसी/२०१७/अति. संवर्ग कक्ष/ नावि/गोंवि/मवि-२/५१४८ दिनांक ०३ मे, २०१८ अन्वये निर्गमित केलेले असून शासनमान्य शिक्षकेत्तर रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| वर्ग | पदनाम व वेतनश्रेणी | प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | खेळाडु | अपंग | प्रकल्पग्रस्त | माजी सैनिक | समांतर आरक्षण व्यतीरिक्त पदे (सर्वसाधारण) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | सहाय्यक कुलसचिव १५६००-३९१०० ग्रे. वे. ५४०० | अ.ज. | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | खुला | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| ब | अधिक्षक ९३००-३४८०० ग्रे. वे. ४४०० | अ.जा. | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | अ.ज. | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | खुला | २ | १ | -- | -- | -- | -- | १ |
| क | सांख्यिकी सहाय्यक ९३००-३४८०० ग्रे. वे. ४३०० | खुला | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | निम्नश्रेणी लिपीक ५२००-२०२०० ग्रे. वे. १९०० | अ.जा. | २ | १ | -- | -- | -- | -- | १ |
| | | अ.ज. | १ | १ | -- | -- | -- | -- | ० |
| | | वि.जा. अ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | खुला | ७ | २ | १ | १ | १ | -- | २ |
| ड | उद्यानरेजा ४४००-७४०० ग्रे. वे. १३०० | खुला | १ | -- | -- | -- | -- | १ | ० |
| | फर्रास ४४००-७४०० ग्रे. वे. १३०० | खुला | १ | १ | -- | -- | -- | -- | ० |
| | एकुण | | २० | ०६ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | १० |

उपरोक्त पदाकरीताची आवश्यक शैक्षणिक अर्हता, संगणकीय अर्हता, अनुभव, वयोमर्यादा, आवेदन शुल्क, वय, ईत्यादीबाबतची माहिती तसेच अर्जदारांसाठी आवश्यक सूचना, अटी व शर्ती आणि आवेदनपत्राचा विहीत नमुना विद्यापीठाच्या **www.unigug.org** या संकेतस्थळावर **Recruitment Tab** मध्ये उपलब्ध असून पात्र उमेदवारांनी संकेतस्थळावर उपलब्ध आवेदनपत्राच्या विहीत नमुन्यात, सर्व बाबतीत परिपूर्ण असलेले आवेदनपत्र **दिनांक २२/०५/२०१८ पासून दिनांक २५/०६/२०१८ पर्यंत** मा. कुलसचिव(प्र.) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम.आय.डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली ता. जि. गडचिरोली पिन-४४२६०५ येथे कार्यालयीन वेळेत सादर करावे.

कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली

## सरळसेवेव्दारे शिक्षकेत्तर पदभरती जाहिरात

जाहिरात क्रमांक :- २७/२०१८ दिनांक:- **२२/०५/२०१८**

**या जाहिरातीमधील पदांकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व अनुभव.**

| गट अ | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदनाम** | **शैक्षणिक व संगणक अर्हता, अनुभव, वयोमर्यादा व पात्रतेचे निकष** |
| ०१ | **सहाय्यक कुलसचिव** | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युत्तर पदवी अथवा १२ वी नंतरची किमान ५ वर्ष शैक्षणिक कालावधीची पदवी उत्तीर्ण.<br>२. अधिक्षक / कक्षअधिकारी(सर्वसाधारण) जो यास्तव समकक्ष पदावरील वेतन बँड ९३००-३४८०० ग्रे.वे. रू. ४४००/- मधील किमान तीन वर्षाचा प्रशासकिय कामाचा अनुभव.<br>**अथवा**<br>महाविद्यालयीन स्तरावरील पूर्णवेळ शिक्षक म्हणुन अध्यापनाचा रू.९३००-३४८०० ग्रे.वे. रू. ४४००/- मधील किमान पाच वर्षाचा शैक्षणिक अनुभव.<br><br>**संगणक अर्हता:-**<br>उमेदवारांना MS-CIT या संगणकिय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. अथवा, महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र. २७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ मध्ये नमूद संगणकिय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br><br>**वयोमर्यादा:-**<br>• सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा ३० वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षाची शिथीलता असेल.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील अनुसूचीमध्ये उल्लेख करण्यात आलेली विद्यापीठे व त्यांची संलग्नित महाविद्यालये आणि शासन मान्यताप्राप्त संस्थेत नियमीत / कायम पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यासांठी वयाची अट लागू राहणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| | **गट ब** | |
| **अ.क्र.** | **पदनाम** | **शैक्षणिक व संगणक अर्हता, अनुभव, वयोमर्यादा व पात्रतेचे निकष** |
| ०२ | **अधिक्षक** | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. विद्यापीठातील लिपीक संवर्गातील किंवा समकक्ष वेतनश्रेणीतील किमान पाच वर्षाचा प्रशाकिय / कार्यालयीन कामाचा अनुभव.<br>**अथवा**<br>शासकिय सेवेतील किंवा शासनमान्य शैक्षणिक संस्थेतील गट क संवर्गामधील एकुण पाच वर्षाचा प्रशासकिय / कार्यालयीन कामकाजाचा अनुभव.<br>**संगणक अर्हता:-**<br>उमेदवारांना MS-CIT या संगणकिय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. अथवा, महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र. २७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ मध्ये नमूद संगणकिय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>**वयोमर्यादा:-**<br>• सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा २५ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षाची शिथीलता असेल.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील अनुसूचीमध्ये उल्लेख करण्यात आलेली विद्यापीठे व त्यांची संलग्नित महाविद्यालये आणि शासन मान्यताप्राप्त संस्थेत नियमीत / कायम पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यासांठी वयाची अट लागू राहणार नाही. |
| | **गट क** | |
| ०३ | **सांख्यिकी सहाय्यक** | १. सांख्यिकीशास्त्र विषयातील पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण **अथवा** सांख्यिकीशास्त्र या विषयासह गणित/अर्थशास्त्र/वाणिज्य या विषयातील किमान व्दितीय श्रेणीत पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण.<br>२. मान्यताप्राप्त संस्थेतील सांख्यिकीशास्त्र अभ्यासक्रमात प्रमाणपत्र/पदविकाधारक उमेदवारांना प्राधान्य.<br>**संगणक अर्हता:-**<br>उमेदवारांना MS-CIT या संगणकिय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. अथवा, महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र. २७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ मध्ये नमूद संगणकिय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>**वयोमर्यादा:-**<br>• सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षाची शिथीलता असेल.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील अनुसूचीमध्ये उल्लेख करण्यात आलेली विद्यापीठे व त्यांची |

<table>
<tr><td></td><td></td><td>संलग्नित महाविद्यालये आणि शासन मान्यताप्राप्त संस्थेत नियमीत / कायम पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यासांठी वयाची अट लागू राहणार नाही.</td></tr>
<tr><td>०४</td><td>निम्नश्रेणी लिपीक</td><td>१. एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण.<br>२. मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. शासकिय व्यावसायिक प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक तसेच पदवीधारकास प्राधान्य.<br>संगणक अर्हता:-<br>उमेदवारांना MS-CIT या संगणकिय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. अथवा, महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र. २७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ मध्ये नमूद संगणकिय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>वयोमर्यादा:-<br>• सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षांची शिथीलता असेल.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील अनुसूचीमध्ये उल्लेख करण्यात आलेली विद्यापीठे व त्यांची संलग्नित महाविद्यालये आणि शासन मान्यताप्राप्त संस्थेत नियमीत / कायम पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यासांठी वयाची अट लागू राहणार नाही.</td></tr>
<tr><td colspan="3">गट ड</td></tr>
<tr><td>०५</td><td>फर्रास</td><td rowspan="2">१) वर्ग ८वी उत्तीर्ण शारिरीकदृष्टया सक्षम.<br>वयोमर्यादा:-<br>सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षांची शिथीलता असेल.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील अनुसूचीमध्ये उल्लेख करण्यात आलेली विद्यापीठे व त्यांची संलग्नित महाविद्यालये आणि शासन मान्यताप्राप्त संस्थेत नियमीत / कायम पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यासांठी वयाची अट लागू राहणार नाही.</td></tr>
<tr><td>०६</td><td>उद्यानरेजा</td></tr>
</table>

## अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्याआधी व पाठविण्यायपूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, प्रवर्ग ईत्यादी वरील बाबी पडताळून पाहाव्यात तसेच खालील **सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.**

१. सदर जाहिरातीतील पदसंख्या, निवड प्रक्रिया व नेमणुका ह्या शासन मान्यतेच्या अधिनस्त राहतील.

२. सदर जाहिरातीतील अटी व शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

३. सदर जाहिरातीतील पदांसाठी छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची निवड विद्यापीठाचे निदेश क्रमांक १२/२०१८ मधील परिच्छेद ५ (अ, ब, क, ड, ई व फ) अन्वये करण्यात येईल.

४. सर्व पदांसाठी अर्जदारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

६. उमेदवारांनी विद्यापीठाच्या **www.unigug.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्येच टंकलिखीत, हस्तलिखीत किंवा संगणकिय प्रिंट केलेला अर्ज (संपूर्ण कागदपत्रांसह) सादर करावा. विहित नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करून नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे. **अर्जदाराने ओवदनपत्रातील प्रपत्र अ मध्ये माहिती भरणे अत्यावश्यक आहे.** सदर प्रपत्रात माहिती सादर न केल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

७. अर्जदाराने अर्जाच्या विहीत नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी **स्वतःचा स्वसाक्षांकित केलेला फोटो** लावावा.

८. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक व लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित/स्वक्षांकित करून अर्जासोबत जोडाव्यात. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.

९. अर्जासोबत **मागासवर्गीय(अ.जा., अ.ज., वि.जा., भ.ज., वि.मा.प्र. व इ.मा.व., इत्यादी) उमेदवारांनी रूपये ३००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रूपये ५००/-** चा **"वित्त व लेखा अधिकारी(Finance & Account Officer), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली"** यांचे नांवे काढलेला **धनाकर्ष(Demand Draft)** जोडावा.

१०. शासन निर्णय क्र. प्रानिम-२००७/प्र.क्र.-४६/०७/१३-ऐ, दिनांक १९.१०.२००७ मधील निर्देशानुसार माजी सैनिक उमेदवारांनी डिस्जार्च प्रमाणपत्र (Discharge Certificate) सादर केल्यास त्यांना आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

११. प्रत्येक पदासाठी केलेला अर्ज वेगवेगळ्या लिफाफ्यात भरून **"---------------------------------- या पदासाठी अर्ज"** असे लिफाफ्यावर लिहून **दिनांक २५/०६/२०१८ रोजी सांयकाळी ५.३० पर्यंत कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम.आय.डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली ता. जि. गडचिरोली पिन ४४२६०५** यांच्याकडे उपरोक्त नमूद केलेल्या तारखेपर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे.

१२. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, इतर विद्यापीठे किंवा शासकिय सेवेत कार्यरत असलेल्या अर्जदारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयामार्फत (Through Proper Channel) सादर करण्याच्या अंतिम तारेखपर्यंतच म्हणजेच दिनांक **२५/०६/२०१८** रोजी सायंकाळी ५.३० वाजपर्यंत सादर करावयाचे आहे. उपरोक्त मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज रद्दबातल ठरविण्यात येतील.

१३. सुवाच्च्य अक्षरात नसलेले, अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत अर्हता,

अनुभव, वय, जात प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे(Non-Creamy Layer) प्रमाणपत्र, जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र इत्यादी लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित, साक्षांकित/स्वक्षांकित नसलेल्या प्रती न जोडलेले अर्ज, अर्जासोबत आवश्यक राशीचे धनाकर्ष न जोडलेले अर्ज, टपालखात्याच्या दिरंगामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रासह नसलेले अर्ज नाकारण्यात येतील व त्याबाबतचा कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१४. **अर्जदाराची शैक्षणिक पात्रता, अनुभव व वय हे अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.**

१५. अर्जाच्या छाननीअंती अर्जदार अपात्र ठरल्यास याबाबतची माहिती संबंधीत अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविली जाणार नाही.

१६. उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यावर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकिय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारास अपात्र समजले जाईल.

१७. मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१८. विद्यापीठ प्रशासनाव्दारे आयोजित मुलाखतीस पाचारण करण्यात येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरीता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१९. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीउपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र होईल.

२०. उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८४ च्या अधिन राहील.

२१. अर्जदाराला अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यात बदल करावयाचा असल्यास याबाबत उपकुलसचिव, आस्थापना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम.आय.डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली ता.जि. गडचिरोली पिन ४४२६०५ यांना त्वरीत कळवावे लागेल.

२२. ई-मेल किंवा फॅक्सव्दारे प्राप्त झालेले अर्ज रद्द समजण्यात येतील.

२३. पदांच्या संख्येत वाढ किंवा घट झाल्यास, रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत, जाहिरातीत बदल किंवा दुरूस्ती करण्याबाबत, तसेच संपूर्ण जाहिरात रद्द करण्याबाबतचे अधिकार गोंडवाना विद्यापीठ, प्रशासनाने राखून ठेवले आहे.

२४. सेवा शर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल. याबाबतचा पत्रव्यवहार करणे बंधनकारक राहणार नाही.

२५. उमेदवारांना लेखी/व्यावसायीक परिक्षा व मुलाखतीकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास व इतर भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

२६. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशासन २००/प्र.क्र./२००१/३२, दिनांक २० जुलै, २००२ नुसार अनुषंगिक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली नमुद केलेल्या पैकी एक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**अ)** डी. ओ. इ. ए. सी. सी. संस्थेच्या अधिकृत 'सी.सी.सी.' किंवा ओ स्तर, किंवा ए स्तर, किंवा बी स्तर, किंवा सी स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

**ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.

**क)** माहिती व तंत्रज्ञान(सामान्य प्रशासन विभाग) कडील शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ अन्वये नमुद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

२७. सामान्य प्रशासन विभाग क्र. एस. आर. व्ही.-१०९७/प्र.क्र. ३१/९८१/१३-अ, दिनांक १६/०३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.जा. अ, भ.ज. ब, भ. ज. क, भ. ज. ड, विमाप्र, इमाव आणि खुला प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार होणाऱ्या राखीव पदांची संख्या पदाचा तपशिल या शिर्षाअंतर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर आरक्षणाची पदे त्या-त्या सामाजिक प्रवर्गातून भरण्यात येतील.

२८. रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर या कार्यालयाकडे विहीत केलेल्या पदध्दतीप्रमाणे अर्ज सादर करावा.

२९. अपंग, प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त व माजी सैनिक, खेळाडू उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहील.

३०. अनुसूचित जाती व जमाती व्यतिरिक्त वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागू आहे अशा संबंधीत उमेदवारांनी शासन परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५, दिनांक ५ जून, २००६ नुसार त्याबाबतचे अप्रगत गट प्रमाणपत्राची मुळ प्रत मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

३१. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. रक्रिधो २००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ०३.०४.२००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्चवयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात नसल्याचे अद्ययावत वैध असलेले (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील (शासन निर्णय परिशिष्ट - अ नुसार) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे असावेत.

३२. अपंग प्रवर्गातील उमेदवारांसाठी अपंगत्वाचे प्रमाणपत्र किमान ४० टक्के असणे आवश्यक असून तसे संबंधीत जिल्हा शासकिय रूग्णालय अथवा प्राधिकृत केलेल्या वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र साक्षांकित करून अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

३३. शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक १४/२०००/प्र.क्र.४३/व-१०, दिनांक २४ मे, २००१ नुसार निवड झालेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवाराला जातीचे वैधत प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नेमणुकीचे आदेश पत्र देण्यात येईल.

३४. महिला आरक्षण, शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ- २०००/ प्र.क्र. ४१५/का-२, दिनांक २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार राहील. मागासवर्गीय प्रवर्गातील महिलांनी

त्यांच्या प्रवर्गातील महिला आरक्षणाच्या लाभाकरीता सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३५. शासन अधिसूचना, सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००४/ प्र.क्र.५००/मावक-५, दिनांक ५ मार्च, २००५ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना (अनुसूचित जमाती वगळून) सहा महिन्यांच्या कालावधीत तत्सम प्राधिकरणाकडून जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून सादर करावे लागेल.

३६. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी "नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू राहील. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने भरतीकरीता वेळोवेळी जाहिर केलेले सर्व शासन निर्णय बंधनकारक राहतील.

३७. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/१२, दिनांक २८ मार्च, २००५ नुसार शासन सेवेतील गट अ ते गट ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी विहित केलेली "लहान कुटुंबाची" अतिरिक्त अट लागू केलेली आहे. या नियमातील तरतुदीनुसार शासकिय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

दिनांक :- २२/०५/२०१८
ठिकाण:- गडचिरोली

**कुलसचिव(प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**